# अरे व्वा, मोहीम फत्ते...!



## मेट्रो-३ मार्गावरील भुयारीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण

▸ मुंबई । मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानकावर बुधवारी ४२वा आणि प्रकल्पातील अंतिम भुयारीकरणाचा टप्पा पार पडला. अपलाईन मार्गावरील या भुयारीकरणास एकूण ४३ दिवसांचा कालावधी लागला. यामध्ये ५५८ कॉंक्रीट रिंग्सचा वापर करण्यात आला.

मेट्रो-३ मार्गातील सर्वात लांब पट्ट्यांपैकी एक असलेल्या पॅकेज-३ मध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. पॅकेज-३ अंतर्गत महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतचे ८३७ मीटरचे सर्वात आव्हानात्मक भुयारीकरणाचे काम रॉबिन्सच्या टीबीएम तानसा-१ने यशस्वीरित्या पूर्ण केले.

आम्ही कामगारांच्या सुरक्षेशी तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञान वापरले. प्रकल्प सल्लागार कंत्राटदार एमएमआरसीच्या संपूर्ण टीमसाठी हे एक जिकिरीचे काम होते. मेट्रो-३ हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईकरांना जलद, आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळेल, असे मत एमएमआरसीचे संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता यांनी व्यक्त केले. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाचे एकूण ७६.६ टक्के काम पूर्ण झाले आहे.

### ही आनंदाची बाब - अश्विनी भिडे

मेट्रो-३च्या भुयारी मार्गाचे काम १०० टक्के पूर्ण झाले या क्षणाचे साक्षीदार होताना मला अतिशय आनंद होत आहे. हा मार्ग मुंबईच्या ऐतिहासिक वारसा इमारती, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती, सध्याचा मेट्रो मार्ग, रेल्वेमार्ग, नदी आणि कठीण भौगोलिक रचना असलेला परिसर आदींच्या खालून व अगदी जवळून जात असल्याने मेट्रो-३साठी भुयारीकरण करणे खूपच आव्हानात्मक होते, असे मत एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले.